# पुणे जिल्हा होमगार्ड सदस्य नोंदणी – २०२४

## सूचना – पुणे जिल्हा होमगार्ड सदस्य नोंदणी कार्यक्रम वेळापत्रक.

होमगार्ड ही एक शासन संचलित पुर्णतः मानसेवी संघटना असून यामधे कोणत्याही प्रकारचे वेतन दिले जात नाही, आवश्यकते नुसार कर्तव्यावर बोलाविण्यात येते त्याचे मानधन प्रति दिन बंदोबस्त कालावधी मधे ५७०/- कर्तव्य भत्ता व १००/- रुपये उपहार भत्ता दिला जातो. पुणे जिल्हा होमगार्ड सदस्य नोंदणी करिता पुणे जिल्हयातील ज्या रहिवासी (आधारकार्ड / मतदान ओळखपत्र) उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज केला आहे त्यांचेकरिता खालील प्रमाणे नोंदणी कार्यक्रम आयोजित केलेला आहे. **सदर नोंदणी फक्त पुणे जिल्हयातील रहिवाशी उमेदवारांकरिता असून इतर जिल्हयातील ऑनलाईन अर्ज केलेले सर्व उमेदवार ज्यांना एस.एम.एस. प्राप्त झाला असेल परंतू त्यांचे आधारकार्ड वरील पत्ता हा पुणे जिल्हया बाहेरील असेल तर ते सदर नोंदणीस अपात्र आहेत. त्यामुळे पुणे जिल्हा सोडून इतर जिल्हयातील उमेदवारांनी नोंदणी कार्यक्रमाकरिता उपस्थित राहू नये. त्यांना मैदानामध्ये प्रवेश दिला जाणार नाही. तसेच रहिवाशी भागातील पथक/उपपथक सोडून इतर पथकात अर्ज केलेले उमेदवार सुध्दा कागदपत्र पडताळणी मध्ये अपात्र ठरतील.**

अर्ज केलेल्या उमेदवारांना कागदपत्र पडताळणी,शारिरिक पात्रता व क्षमता चाचणी याकरिता दिनांक १९/०८/२०२४ ते २३/०८/२०२४ या कालावधिमध्ये दररोज सकाळी ५.३० वाजता खालील प्रमाणे **पुरंदर हॉल, पोलीस कवायत मैदान, पोलीस अधीक्षक कार्यालय,पुणे ग्रामीण,चव्हाणनगर,पाषाण**,येथे बोलाविणेत येत आहे. उमेदवारांना सकाळी ५.३० ते सकाळी १०.०० या कालावधिमध्येच मैदानात प्रवेश दिला जाईल.

| अ.क्र. | दिनांक | बोलाविण्यात आलेले अर्ज नोंदणी क्र. | उमेदवार संख्या |
|---|---|---|---|
| १. | १९/०८/२०२४ | अर्ज क्र. ०००01 ते २३९० मधील फक्त पुरूष उमेदवार | २००० |
| २. | २०/०८/२०२४ | अर्ज क्र. २३९१ ते ५७८५० मधील फक्त पुरूष उमेदवार | २७०० |
| ३. | २१/०८/२०२४ | अर्ज क्र. ५७८१ ते ९१८४ मधील फक्त पुरूष उमेदवार | २७०० |
| ४. | २२/०८/२०२४ | अर्ज क्र. ९१८६ ते १२७९० मधील फक्त पुरूष उमेदवार | २७५६ |
| ५. | २३/०८/२०२४ | अर्ज क्र. ०००१ ते १२७९० मधील सर्व महिला उमेदवार | २७८५ |

**(टिप – पुणे जिल्हयातील रहिवासी असलेल्या सर्व पुरूष व महिला उमेदवार यांना उपरोक्त तक्त्यामधील नमुद अर्ज नोंदणी क्रमांकानुसार दिलेल्या पत्त्यावर वेळेत हजर राहावे. तसेच सदर नोंदणी बाबत आपणास एसएमएस व्दारे देखील अवगत करणेत येईल. ज्यांना एसएमएस प्राप्त झालानाही अशा उमेदवारांनी उपरोक्त तक्त्याच्या आधारे मैदानी चाचणी करीता उपस्थित राहावे. )**

**उमेदवारांनी मैदानी चाचणी व कागदपत्र पडताळणीकरीता येताना खालील प्रमाणे मूळ कागदपत्र व त्यांचे २ झेरॉक्स संच (मुख्याध्यापक किंवा शासकीय अधिकारी यांचेकडून) साक्षांकित करून घेऊन यावेत.**

१. १० वी / १२ वी बोर्डाचे प्रमाणपत्र

२. आधारकार्ड कार्ड

३. मतदान ओळखपत्र

४. शाळा सोडल्याचा (१०वी चा)

## **तांत्रिक गुणांकरीता आवश्यक असणारी कागदपत्रे**

१. शासकीय /शासन मान्य संस्थेचे आय.टी.आय. (प्रमाणपत्र किमान ६ महिने )

२. जिल्हा क्रिडा अधिकारी यांचेकडील खेळामध्ये पदक (सुवर्ण/ रौप्य/ कांस्य) प्राप्त प्राविण्य प्रमाणपत्र.

३. माजी सैनिक, डिस्चार्ज कार्ड आवश्यक.

४. एन.सी.सी. बी प्रमाणपत्र

५. एन.सी.सी. सी प्रमाणपत्र

६.नागरी संरक्षण सेवेत किमान ३ प्रशिक्षण पुर्ण केलेले प्रमाणपत्र.

७. जड वाहनचालक परवानाधारक (पक्के लायसन )

८. पासपोर्ट आकाराचे ३ रंगीत फोटो.

## **विशेष सूचना-**

१. उमेदवारांनी कागदपत्र पडताळणी व शारिरिक क्षमता चाचणी करिता येताना अर्जासह आवश्यक मूळ कागदपत्रांच्या २ छायांकित प्रती साक्षांकित करून अर्जासोबत जोडाव्यात. अर्ज नोंदणीच्या दिवशी स्वतः घेवून यावे. तसेच दोन फोटो व मुळ कागदपत्र नोंदणीच्या वेळी पळताळणीकरिता बंधनकारक राहील. उमेदवारांना नोंदणीकरिता स्वःखर्चाने उपस्थित राहावे लागेल, नोंदणी दरम्यान किंवा प्रवासा दरम्यान कोणतीही दुखापत झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील.

२. उमेदवारांना **शारिरिक क्षमता चाचणी मध्ये पात्र होणेकरिता प्रत्येक प्रकारामध्ये किमान निर्धारित गुण मिळविणे आवश्यक राहील. (धावणे या प्रकारात किमान १० गुण व गोळाफेक या प्रकारात किमान ४ गुण आवश्यक )** धावणे चाचणी प्रकारामध्ये अपात्र ठरल्यास गोळाफेक चाचणी घेतली जाणार नाही. **मात्र धावणे चाचणी मधिल अपात्र उमेदवारांना त्यांचे डिटेल सोबत शेवट पर्यंत थांबावे लागेल व चेस्ट क्रमांक जमा करावा लागेल. तसेच मध्येच निघून गेलेल्या उमेदवारांवर दंडात्मक कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.**

३. उमेदवारांनी कोणत्याही किंमती वस्तू सोबत आणू नयेत आणि आणल्या तर त्या स्वतःचे जबाबदारीवर सांभाळाव्यात याची कोणतीही जबाबदारी आयोजकांवर राहणार नाही. कोणत्याही परिस्थितीमधे उमेदवारांना मैदानामधे मोबइलचा वापर करता येणार नाही. खादय पदार्थ/ फळे/ पाणी बॉटल सोबत घेऊन येण्यास हरकत नाही.

४. सदर होमगार्ड सदस्य नोंदणी प्रक्रीया अत्यंत पारदर्शक व इन-कॅमेरा पार पाडणेत येणार असून होमगार्ड सदस्य नोंदणी करिता हजर उमेदवारांनी कोणत्याही अमिषाला बळी पडू नये. तसेच शिफारस/वशिला इ.गैरमार्गाचा वापर करु नये. तसेच होमगार्ड सदस्य नोंदणी करिता कोणी पैसे अथवा लाचेची मागणी केल्यास तात्काळ मा.अपर पोलिस अधिक्षक,पुणे ग्रामीण अथवा अधिक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय,पुणे यांचेकडे तक्रार करावी. तसेच उमेदवारांनी नातेवाई किंवा मित्र यांना मैदानामधे प्रवेश दिला जाणर नाही, बनावट कागदपत्रे व तोतया उमेदवार आढळून आल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

५. अतिवृष्टीमुळे अथवा नैसर्गिक आपत्तीमुळे वेळापत्रकामध्ये बदल झाल्यास त्याची सूचना https://maharashtracdhg.gov.in/mahahg/enrollmentadd.php या संकेत स्थळावर वेळोवेळी देण्यात येईल त्यामुळे उमेदवारांनी सदर संकेत स्थळावरील सुचनाकरिता अद्यावत रहावे. तसेच इतर कोणत्याही मदती करीता ९०७५७४७४७१ क्रमांकावर संपर्क साधावा.

६. सदरील नोंदणी प्रक्रिया रदद करण्याचे सर्व अधिकार जिल्हा समादेशकांना राहतील.

मा.जिल्हा समादेशक होमगार्ड पुणे तथा
अप्पर पोलिस अधिक्षक पुणे ग्रामीण यांचे आदेशन्वये